आर.सी.सी क्र. ७९०/२०२५
सरकार विरुध्द हर्षकुमार
निशाणी क्र. ५५/ क लगत

**दिनांक २९.०९.२०२५ रोजी–**

**अभियोग पक्षाचा सा. क्र.१. श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची शपथेवर पुढील उलटतपासणी आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. बर्जे पी.एस.,विधीज्ञ यांचे द्वारा सुरू–**

**६२**. हॉकी ॲस्टॉटर किंवा ४०० मिटर सिंथेटीक ट्रॅक याबद्दल जो काही निधी मंजुर झाला अथवा तो निधी बँक खात्यात वेगळा ठेवावा असे मी जे काही सांगीतले आहे त्याबद्दल कुठलाही कागदोपत्री पुरावा अथवा आदेश मी दाखल केलेला नाही. हे म्हणने खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल समितीकडे दर महिन्यांचे बँकेचे अकाउंन्ट स्टेटमेंट असतात. हे म्हणने खरे आहे की, विभागीय क्रिडा संकुल समितीची जेंव्हा कधी लेखा परिक्षण झाले त्यावेळेला बँकेच्या खात्याचे अकांउन्ट स्टेटमेंट त्या ऑडीटच्या तारखेपर्यंत उपलब्ध होते. हे म्हणने खरे नाही की, त्यामुळेच पुन्हा बँकेचे अकाउंन्ट स्टेटमेंट लेखा परिक्षणासाठी मागविण्याची आवश्यकता नव्हता. हे म्हणने खरे आहे की, दिनांक २६.०८.२०२४ ते १०.०९.२०२४ या कालावधीत जे कथीत लेखापरिक्षण झाले त्या बद्दलचे कागद ना न्यायालयात हजर केले अथवा तपासात पोलीसांना दिले. हे म्हणने खरे आहे की, माझे असे कुठेच म्हणने नाही की, जेंव्हा कधी ते कथीत लेखा परिक्षण झाले त्यावेळेला मी वैयक्तीकरित्या तेथे हजर होतो. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५५–सरतपास व निशाणी क्र.६६ फिर्याद जबाब यावेळेला सुध्दा हे कथील लेखापरिक्षण झाले असे माझे म्हणने आहे, त्यातील लेखापरिक्षक कोण हे मला माहीत नाही. श्री. संजय सबनीस यांचेकडे दर महिन्याचे बँकेचे अकाउन्ट स्टेटमेंट पाहण्यासाठी जाण्यापुर्वी कार्यासन अधिकारी श्री. स्वप्नील तांगडे यांनी तपासण्याचे आवश्यक असते. हे म्हणने खरे आहे की, ही जबाबदारी स्वप्नील तांगडे यांची होती. श्री. स्वप्नील तांगडे यांच्याकडे बँकेचे दरमहा अकाउन्ट स्टेटमेंट आणुन देण्याचे काम हे लेखा लिपीक यशोदा शेट्टी यांचे होते.

**६३**. हे म्हणने खरे आहे की, दिनांक २५.०८.२०२४ पर्यंत श्री. संजय सबनिसांनी गैरव्यवहाराबाबत कधीही कोणालाही कळविलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, दिनांक २५.०८.२०२४ पर्यंत श्री. संजय सबनिस यांनी जे काही बँक स्टेटमेंट तपासले यामध्ये त्यांना कोणताही गैरव्यवहार आढळून आलेला नाही.

**प्रश्न**– जो पर्यंत लेखा परिक्षक हे संजय सबनिस यांना गैरव्यवहार झाल्याचे सांगीतले नाही तो पर्यंत त्यांना गैरव्यवहार झाल्याचे समजले नाही.?

**उत्तर**– लेखा परिक्षकाने पण गैरव्यवहार झाल्याचे सांगीतले नाही. गैरव्यवहार झाल्याचे नंतर समजले.

माझ्या फिर्याद जबाब–नि.क्र.६६ व अधिकारपत्र–नि.क्र.७० मध्ये ज्या व्यक्तीला गैरव्यवहार झाल्याचे लेखा परिक्षणानंतर समजले असे स्पष्ट वाक्य अथवा नाव नमुद नाही. हे म्हणने खरे आहे की, श्री. संजय सबनिस यांनी गैरव्यवहाराबाबत वरिष्ठांना कळविल्याचे अभिलेख दाखल

नाही केले. हे म्हणने खरे नाही की, श्री. संजय सबनिस यांनी आज अखेर विभागीय क्रीडा संकुल समिती येथे गैरव्यवहार झाल्याचे कळविलेच नाही. हे म्हणने खरे आहे की, नि.क्र.५५ व नि.क्र.६६ मध्ये लेखा परिक्षकांनी व श्री. संजय सबनिस यांनी आज पर्यंत कधीही आरोपी क्र.१ कडे कधीही कथीत बँक स्टेटमेंट मागिविलेले नाहीत. साक्षीदार पुन्हा सांगतो की, हे चुकीचे आहे. हे म्हणने खरे आहे की, लेखा परिक्षकांचा आरोपी क्र.१ कडे बँक स्टेंटमेंट मागण्याचा कुठलाही संबंध नाही. हे म्हणने खरे नाही की, आरोपी क्र.१ हा वित्त विभागाचा कर्मचारी नसल्याने श्री. संजय सबनिस यांचेकडे बँक अकाउंट स्टेटमेंट मागण्याची गरजच नाही. हे म्हणने खरे नाही की, श्री .संजय सबनिस यांचेची मी संगनमत करुन आरोपी क्र.१ विरुध्द धादांत खोटे कथन करीत आहे.

**६४**. हे म्हणने खरे नाही की, दिनांक ३०.८.२०२४ रोजीच्या बँक स्टेटमेंट मागविण्याच्या पत्राशी आरोपी क्र.१ चा कोणताही संबंध नाही. हे म्हणने खरे आहे की, दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे कथीत बँक स्टेटमेंट मागविण्याचे हे माझ्या समोर तयार झालेले नाही. हे म्हणने खरे आहे की, दिनांक ३०.०८.२०२४ रोजीच्या कथीत पत्राबद्दल मी जे काही सरतपास अथवा माझ्या फिर्याद जबाब मध्ये केलेले कथन हे ऐकीव आहे. हे म्हणने खरे नाही की, कथीत दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे पत्र हे मा. न्यायालयाच्या अभिलेखावर दाखल नाही.

(सहाय्यक सरकारी वकील यांनी कळविले संबंधीत मुळ पत्र हे हस्ताक्षर तज्ञांकडे गेलेले आहे याबद्दल या पत्राच्या प्रती मिळाल्या नाहीत असे आरोपींचे मा. विधीज्ञांन कळविले. सहाय्यक सरकारी वकीलांनी कळविले की, ती पत्र आम्हाला मिळालेली आहे. या पत्राबद्दल सर्व अभिलेख पाहून मग जर पत्राची प्रती दिल्या नसतील तर पत्रांच्या प्रती सर्व आरोपींना देण्यात याव्या व या पत्रासंबंधीचा उलटपास थांबवून पुढील उलटतपास सुरू.)

**६५**. हे म्हणने खरे आहे की, दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे कथीत पत्र हे श्री. संजय सबनिस यांनी न वाचता सही केली असे माझे निशाणी क्र.५५ सरतपास अथवा निशाणी क्र.६६ फिर्याद जबाब यामध्ये म्हणने नाही. मला दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे कथीत पत्र हे आरोपी क्र.१ने बँकेत नेऊन दिले ही माहिती मला बँकेनेच दिली. मी पोलीसांना जबाब देते वेळी हे दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे कथीत पत्र बँकेत आरोपी क्र.१ याने आणुन दिले हे मला बँकेने सांगीतले असे, असे सांगीतले नव्हते. मला बँक मॅनेजर श्री. सुशीलकुमार सैनी यांनी मला आरोपी क्र.१ ने हे पत्र आणुन दिले असे सांगीतले. हे म्हणने खरे नाही की, श्री. संजय सबनिस यांचेशी मी संगणमत करून आरोपी क्र.१ विरुध्दा धादांत खोटे कथन करीत आहे. हे म्हणने खरे आहे की, श्री. सैनी यांनी मला हे कथीत पत्र दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे आरोपी क्र.१ ने बँकेत आणुन दिल्याचे मी पोलीसांना सांगीतले नव्हते.

**६६**. dscch.sambhajinagar@gmail.com हा ईमेल आयडी आरोपीचा आहे या बद्दलचा

कुठलाही पुरावा मी मा. न्यायालयात अथवा पोलीसांकडे हजर केलेला नाही. हे म्हणने खरे आहे की, हा ईमेल आयडी तक्रार देण्यापुर्वी कोणाचा आहे हे मी स्वतः तपासलेले नाही. मला हा ईमेल आयडी आरोपी क्र.१ चा आहे हे श्री. संजय सबनिस यांनी सांगीतले.

**६७.** हे म्हणने खरे आहे की, लेखा परिक्षण समितीचे काम हे क्रॉस व्हेरिफिकेशन व क्रॉस चेकींग सर्व कागदपत्रांचे असे आहे. हे म्हणने खरे आहे की, आजपर्यंत लेखा परिक्षण समितीचे असे कुठेही म्हणने नाही की, त्यांच्या क्रॉस व्हेरिफिकेशन व क्रॉस चेकींगमध्ये जे त्यांनी बँक अकाउन्ट स्टेटमेंट तपासले त्यामध्ये कोणी छेडछाड अथवा (बदल केला) (Edit किंवा त्यामध्ये नवीन काही मजकुर लिहला). हे म्हणने खरे आहे की, इंडीयन बँकेला जे लेखी आदेश विभागीय क्रिडा संकुल समितीने दिले ते त्यांनी आजपर्यंत पाळले. हे म्हणने खरे नाही की, आज अखेर विभागीय क्रिडा संकुल समितीने इंडीयन बँकेच्या विरुध्द कोणतीही तक्रार केलेली नाही. या तक्रारीची कोणतीही पत्र न्यायालयात हजर केलेली नाही. इंडीयन बँकेविरुध्द पोलीसांकडे तक्रार दिलेली नाही. इंडीयन बँके विरुध्द आर.बी.आय.यांचे पोर्टलवर सेक्रेटरी श्री. शेखर पाटील यांनी दिनांक २६.०९.२०२५ रोजी तक्रार दाखल केली. दिनांक २६.०९.२०२५ पर्यंत द्यायचे आगोदर श्री. संजय सबनिस यांनी आर.बी.आय.कडे तक्रार दाखल केली नाही. श्री. संजय सबनिस यांनी ही तक्रार आर.बी.आय.कडे दिनांक २६.०९.२०२५ पुर्वी का केली नाही हे त्यांना विचारा. मी, श्री. शेखर पाटील यांनी जी आर.बी.आय.कडे पोर्टलवर जी तक्रार दिली आहे, ती तक्रार मी पाहीली व वाचली आहे. या तक्रारीमध्ये श्री. शेखर पाटील यांनी जे नमुद केले आहे ते थोडक्यात असे कथन की, आरोपी हर्षकुमार क्षिरसागर याने बँकेला दिलेले पत्र यामध्ये बदल केला व त्या बदलाप्रमाणे बँकेने विभागीय क्रिडा संकुल समितीच्या खात्याच्या इंटरनेट बँकीग एक्सेस आरोपी हर्षकुमार याला दिला व त्यातुन त्याने विभागीय क्रिडा संकुल समितीच्या रक्कम रुपये ५९ लाख रुपयांचा अपहार केला. तक्रार देतांना बँकेने इंटरनेट बँकीगचा एक्सेस आरोपी क्र.१ला दिल्याचे विभागीय क्रीडा संकुल समितीला व मला तक्रार देण्यापुर्वी कळले होते.

प्रश्न– मी स्वतः बँकेला आरोपी का नाही केले?

उत्तर – मला जे सांगीतल ते मी केले.

मला दिलेल्या अधिकारपत्रात ११ आरोपींची नावे नाहीत. साक्षीदार पुन्हा सांगतो की, तक्रारीत मी दोनच लोकांची नावे सांगीतली. श्री. शेखर पाटील यांनी विभागीय क्रिडा संकुल समितीच्या अध्यक्षांकडे लेखी तक्रार केलेली नाही.

**मा. आरोपी क्र.१ च्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून**

**उर्वरीत उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.**

समक्ष
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– २९/०९/२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती.
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद